<u>नियमित दिवाणी दावा क्रं. ११०/२०१३ मधील अर्ज (नि.२९) वरील आदेश</u>

CNR: MHST14-000757-2013

वादीतर्फे दाखल अर्ज (नि.२९), सोबतचे प्रतिज्ञापत्र व प्रतिवादीतर्फे दाखल अर्ज/म्हणणे (नि.३१) वाचले. दोन्ही वकिलांतर्फे युक्तिवाद ऐकला. कागदपत्रे तपासली.

२. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेशीका ६ नियम १७ अन्वये कैफियतीमध्ये दुरुस्ती करणेकरीता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द मौजे वाखरी येथील गट नं.५८१, ५८३ व ५७५ मिळकतीमधील प्राप्त हिस्सा तुटक व पृथक करुन मिळणेकरीता तसेच दि.१० जुलै २०१२ रोजी केलेले वाटपपत्र वादीचे हिस्स्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव करुन मिळणेकरीता दाखल केला आहे. वाद मिळकती हिंदू एकत्र कुंटुंबाच्या असून, दि.२२/०१/२००१ रोजी झालेल्या वाटपात सदर मिळकती समाविष्ठ केल्या नाहीत. सबब, वाटपातील मिळकती वगळून इतर दावा मिळकतीकरीता दावा दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात कलम ३ मधील अ,ब, क, ड मध्ये नमुद केलेल्या दुरुस्ती दाव्यातील अनुक्रमे पॅरा कलम १, ४, ७ व ८ मध्ये करुन मिळणेकरीता प्रस्तुत अर्ज केला आहे.

३. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ विषय अथवा स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच सदर दुरुस्ती ही चौकशी पुर्व असल्याचे कथन केले. सबब, वादीने कलम ३ मधील अ, ब, क व ड असे प्रस्तुत अर्जात नमुद केलेले मजकुर दुरुस्ती करुन सामील करणेची विनंती केली. सदरची दुरुस्ती दाव्याच्या सरनाम्यात करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असून, दावा मिळकती संदर्भाने निर्माण झालेले वाद कायमस्वरुपी संपुष्टात यावे म्हणून प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादीने म्हणणे (नि.३१) दाखल करुन, अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे कथनानुसार, वादी व प्रतिवादी क्रं.१ व २ यांचेमध्ये दि.२२/०१/२००१ रोजी वडिलोपार्जित एकत्र कुंटुबातील मिळकतीचे वाटप झाले होते. मे.तहसिलदार फलटण, यांचे आदेशाप्रमाणे सदर वादी व प्रतिवादी क्रं.१ व २ यांच्या नावच्या नोंदी फे.फा.क्रं.१७२८ अन्वये दि.१५/०३/२००१ रोजी होवुन सदर फेरफार दि.३१/०४/२००१ रोजी मंजूर करणेत आला. सदर मिळकतीचे वाटप झाल्यानंतर १२-१३ वर्षानेे केलेल्या अर्जाचा कायदयाने विचार करता येणार नाही. तसेच दावा दाखल करणेपुर्वीच्या घटनेविषयी दुरुस्ती मागता येणार नाही. वादी नव्याने दाव्यात समाविष्ट करु पाहत असणा-या मिळकती या एकत्र कुंटुंबाच्या नाहीत. जाहीर ठरावाची मागणी ही मुदतबाहय आहे. वरील सर्व कारणास्तव प्रतिवादीने अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

५. प्रस्तुत दावा वाटपासाठी दाखल असलेने प्रस्तावित दुरुस्ती ही कायदेशीर बाबी व मुद्दयांशी निगडीत आहे. वादीची मागणी मुदतीत आहे किंवा मुदतबाहय आहे तसेच सदर कथने आव्हानीत करणेस प्रतिवादींना संधी उपलब्ध आहे. तसेच दावा अदयाप सुनावणीच्या टप्प्यावर नियुक्त झाला नसल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ मधील परंतुकाची बाधा

प्रस्तुत अर्जास येत नाही. दाव्यावर तसेच प्रतिवादींचे बचावावर विपरीत परीणाम होण्याची शक्यता नाही. सदर दाव्याचा न्यायानिर्णय गुणांवगुणावर निर्णय होणेसाठी अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.२९) मंजूर करणेत येतो. वादीने प्रतिवादीस रु.१००/- कॅास्ट दयावी.

२. वादीने कायदेशीर मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

३. वादी व प्रतिवादींनी नोंद घ्यावी.

फलटण
दि. १७/०१/२०१८.

(सौ.ज.सं.जगदाळे.)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, फलटण.